IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# छत्रपती शिवाजी महाराजांची रणनीती गनिमी कावा : एक अध्ययन

**अमितकुमार गणेश शिंगणे**
संशोधक विद्यार्थी
एम.इ.एस. कॉलेज मेहकर,
जि. बुलढाणा.

**प्रस्तावना -**

सतराव्या शतकामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी दख्खन म्हणजेच आजच्या महाराष्ट्रामध्ये स्वराज्याची निर्मिती केली. छत्रपती शिवाजी महाराजांचे पिता शहाजीराजे हे आदिलशाही, निजामशाही, मुघलशाही या तीनही शाह्यामध्ये सरदारकी केली होती. मराठा सरदार मुळातच चपळ, चलाख, कर्तुत्ववान, पराक्रमी होते. परंतु त्यांचे सारे शौर्य हे मुस्लिमशाह्यांची चाकरी करण्यामध्ये जात होते. त्यामुळे शिवाजी महाराजांनी स्वतःचे स्वराज्य उभे राहावे या उद्देशाने शहाजीराजे आणि जिजामाता यांनी शिवाजी महाराजांना घडवले आणि स्वराज्य उभारणीसाठी मराठ्यांच्या गुणांना हेरून दख्खन हा प्रांत उत्तम असल्याने शिवाजी महाराजांनी दख्खनमध्ये म्हणजेच आजच्या महाराष्ट्रामध्ये स्वराज्याची उभारणी केली.

गनिमी कावा ही युद्धपद्धती वापरण्यामागे शिवाजी महाराजांचा मुख्य उद्देश हाच होता की, स्वराज्यामध्ये सैन्यबळ, शस्त्रसाठा कमी असल्यामुळे ते बलाढ्य अशा शत्रूंचा समोरासमोर सामना करून त्यांना परतून लावू शकत नाही. असे केल्यास त्यामध्ये मराठ्यांच्या सैन्याची जीवित हानी होण्याची शक्यता जास्त होती. त्यामुळे लपून-छपून हल्ले करणारी पद्धत म्हणजेच गनिमी कावा या रणनीतीचा वापर करून शिवाजी महाराजांनी स्वराज्य उभारले; उभारलेच नाही तर ते स्वराज्य बळकट केले आणि स्वराज्याचा धाक संपूर्ण भारतामध्ये निर्माण केला. मोगलशाही तत्कालीन काळातील बलाढ्य अशी राजेशाही असून देखील शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या लहानशा स्वराज्याला ते कधीही जिंकू शकले नाही. उलट औरंगजेबाची संपूर्ण हयात शिवाजी शिवाजी महाराजांचा पराभव करून दख्खन जिंकण्यामध्ये गेला. हे सर्व शक्य झाले ते छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वीकारलेल्या रणनीतीमुळे म्हणजेच गनिमी काव्यामुळे. त्यामुळे शिवाजी महाराजांचे स्वराज्य त्यांच्या हयातीत आणि मृत्यूनंतर देखील संभाजी राजे, राजाराम राजे आणि राजाराम राजाच्या मृत्यूनंतर महाराणी ताराबाई यांनी यशस्वीपणे लढून स्वराज्य सांभाळले. यालाच भारतीय इतिहासात मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध देखील म्हणतात. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर देखील मराठ्यांचे स्वराज्य स्वतंत्र आणि अबाधित राहिले हे सर्व शक्य झाले ते केवळ शिवाजी महाराजांनी विकसित केलेल्या गनिमी कावा या रणनीतीमुळेच. त्यामुळे शिवाजी महाराजांचे स्वराज्य आणि गनिमी काव ह्या दोन गोष्टी परस्परा पासून वेगळ्या करणे अशक्य आहे. त्यामुळे गनिमी कावा ही छत्रपती शिवाजी महाराजांची रणनीती समजून घेणे हा सदर शोधनिबंधाचा उद्देश्य आहे.

**उद्दिष्टे -**

1. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यासाठी आखलेले रणनीती समजून घेणे.
2. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वीकारलेले गनिमी कावा या युद्ध पद्धतीचा आढावा घेणे.
3. गनिमी कावा युध्दाची पार्श्वभूमी, वैशिष्ट्ये, उद्देश्य आणि महत्त्वाचे घटक अभ्यासणे.
4. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वीकारलेल्या गनिमी कावा युद्ध युद्धातील महत्त्वाच्या घटकांचा वैशिष्ट्यांचा आढावा घेणे.
5. स्वराज्यासाठी आखलेली रणनीती ही स्वराज्याच्या रक्षणासाठी कशी प्रभावी ठरली यांचा अभ्यास करणे.
6. स्वराज्यावर आलेल्या संकटाचा सामना गनिमी कावा या रणनीतीने शिवाजी महाराजांनी कशाप्रकारे केला हे जाणून घेणे.

**दख्खन : छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्यक्षेत्र -**

छत्रपती शिवाजी महाराजांनी जिथे स्वराज्य उभारले ते त्यांचे कार्यक्षेत्र म्हणजे दख्खन. दख्खनचा भाग म्हणजे सह्याद्री आणि घाटवाटा यांनी संपन्न असल्याने अतिशय अवघड. मानवी जीवनाच्या प्रारंभापासूनच दुर्ग, पहाड, नद्या-खोरे, वाळवंट, अरण्ये, सागर यातून मानवाने मार्ग शोधले. मध्ययुगीन काळात राजकीय आणि व्यापारी दृष्टीने अनेक नवनवीन मार्ग शोधण्यात आले. यामधील बरेच मार्ग हे जंगल, दुर्गम भाग, पहाडी, वाळवंटी, डोंगरी घाट यातूनच जात असे. यामुळेच राजे - महाराजे, सैन्य, वाटसरू, प्रवासी, साधुसंत इत्यादी सर्वांचेच मार्गक्रमण सोपे नव्हते. असंख्य अडचणींतून आणि हिंस्र पशुंना तोंड देत हा प्रवास चालायचा. या अडचणींचा विचार करून अनेक राजांनी किंवा स्थानिक पातळीवरील वतनदारांनी रस्त्याच्या कडेला विहिरी, तळी बांधली. त्या काळात बैलगाडी, घोडे, उंट, गाढव अशा प्रकारची दळणवळणाची साधने असल्यामुळे पाण्याची सोय करणे आवश्यक होते. रथ आणि पालखी ही देखील साधने होती; परंतु सह्याद्रीच्या डोंगरात आणि घाटवाटात त्यांचा काही उपयोग नसे. म्हणूनच शिवाजी महाराजांनी सह्याद्री भागातील पर्यावरणाचा, उन्हाळा, पावसाळा, हिवाळा या ऋतूंमधील दख्खनमधील वातावरणाचा विचार केला. मावळ्यांची ताकद, घोडे व गनिमी कावा ही रणनीती यांचा वापर करून सह्याद्रीच्या डोंगररांगांत मराठी राज्याची निर्मिती त्यांनी केली. त्या वेळी त्यांनी दुर्गांचाही आधार घेतला.

महाराष्ट्राच्या समुद्रकिना-यावरील कल्याण, सोपारा, चौल, बाणकोट, दामोद देवगड या बंदरांतून परदेशांशी मोठ्या प्रमाणात व्यापार चालत असे. घाटमाथ्यावर पैठण, नाशिक, देवगिरी, कहाड ही व्यापारी शहरे होती. या दोन्हींच्यामध्ये सह्याद्री उभा आहे. मानवाने कोकणात उतरण्यासाठी रस्ता म्हणजेच घाट तयार केला. गरज असेल तेव्हा कातळ सुद्धा फोडून काढून कोकणातून घाटमाथ्यावर असंख्य घाटवाटा निर्माण केल्या.

महमूद गवान इ. स. १४७० मध्ये कोकण मोहिमेवर असताना बहामनीच्या एका वजिराला लिहितो की, “कोकणच्या मोहिमेच्या अडचणी तुम्ही जाणता, कोकण म्हणजे जंगल आणि डोंगर, जंगल झाडी तोडणे व खडक फोडून रस्ते बरोबर करणे, याशिवाय येथे पुढे पाऊल टाकणे अशक्य आहे” यावरून येथील अडचणीची किती तयारी करावी लागते याची कल्पना आपल्याला येईल.

महाराष्ट्र हा नैसर्गिकदृष्ट्या वैविध्यपूर्ण प्रदेश आहे. सह्याद्री, सातपुडा या दोन पर्वतप्रणाली आणि महाराष्ट्र पठार ही महाराष्ट्राची खरी प्राकृतिक रचना आहे. सह्याद्री म्हणजेच पश्चिम घाट ही डोंगररांग आहे. सुमारे 1600 कि.मी. लांबीची ही डोंगररांग तापी नदीच्या दक्षिणेकडून व महाराष्ट्र-गुजरातच्या सीमेलगत. तेथून महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, तामिळनाडू व केरळ या राज्यांतून भारताच्या दक्षिण टोकाकडे पोहोचते. या डोंगररांगेचा 60% भाग हा कर्नाटकात येतो. हाच भारताचा दख्खन होय. या डोगररांगेचे क्षेत्रफळ 8000 चौरस कि.मी. असून अनेक उंच शिखरे आहेत. कळसूबाई शिखराची उंची 1646 मी. इतकी आहे. कर्नाटकात 1682 मी. उंचीवर

कुद्रेमुख शिखर आणि केरळमध्ये अनाईमुदी शिखर त्याची उंची 2695 मी. आहे. भारताचा हा दख्खन भाग सह्याद्रीचा पश्चिम घाट आहे. पश्चिम घाट ही रांग दख्खनच्या पठरातून निर्माण झालेली कडा आहे. उत्तरेला सातपुडा रांगेपासून सुरू झालेल्या सह्याद्रीच्या पर्वतरांगेमध्ये महाराष्ट्रातील माथेरान, महाबळेश्वर, पाचगणी ही ठिकाणे येतात. महाराष्ट्र व कर्नाटक राज्यांच्या मधोमध गोवा खिंड आहे आणि दुसरी पालघाट खिंड आहे. पश्चिम घाट आणि अरबी समुद्र यांच्यामधल्या चिंचोळीपट्टीच्या उत्तरेकडील सपाट भागास कोकण व दक्षिणेला मलवार असे म्हणतात. सह्याद्रीच्या पायथ्याशी पूर्वेकडे असलेल्या भागाला महाराष्ट्र (दख्खन) म्हणतात.

**शिवाजी महाराज आणि गनिमी कावा राजनीती -**

'गनिमीं' हा शब्द फारसी भाषेतील असून 'कावा' हा शब्द फसवणूक अथवा कपट या अर्थाने वापरला जातो. 'गनिमी कावा' ही संज्ञा मराठ्यांच्या शत्रूनी मराठ्यांच्या युद्धपद्धतीसाठी वापरली होती. मराठ्यांनी जिंकलेल्या लढायांमध्ये शत्रूकडे सैन्यबळ आणि युद्धसामग्री अधिक होती तरीसुद्धा मराठे जिंकले. हे शक्य झाले ते शिवाजी महाराजांच्या योग्य रणनीतीमुळे म्हणजेच गनिमी कावा या पध्दतीमुळे. गनिमी कावा हा शब्दप्रयोग शिवकाळानंतर कित्येक देशांनी स्वीकारला. गनिमी कावा राजनीतीला शिवाजी महाराजांनी स्वतःच्या ज्ञान आणि अनुभवातून सक्षम नेतृत्व दिले. संघटन कौशल्य, माणसांची पारख, शत्रूची अचूक माहिती काढणे, आवश्यक युद्धकौशल्य अशा त्यांच्या अंगच्या गुणांमुळे गनिमी कावा युद्धतंत्र त्यांनी विकसित केले. गनिमी कावा दुर्गम क्षेत्रातच लढला जातो म्हणून जनतेशी संपर्क सैन्याला ठेवावाच लागतो. त्यामुळे लष्करांला अचूक सूचना देऊनच शिवाजी महाराज रणक्षेत्र निश्चित करीत.

स्वराज्याचे स्वप्न बाळगताना शिवाजी महाराज व मावळयांजवळ उच्च ध्येयवाद आणि स्वराज्याची प्रेरणा होती. आदिलशाही धनवान व स्थिर सत्ता होती. कुतुबशाही स्थिर होती, मुघल तर अतिशय बलाढ्य होते, धनवान व अफाट लष्कर बाळगणारे होते. शिवाजी महाराजांना मात्र स्वराज्याची आस व मावळयांची साथ यांवर गनिमी कावा रणनीती अनुसरून राष्ट्रीय सेना निर्माण केली. सह्याद्री आणि त्याच्या घाटवाटा मात्र त्यांच्या पाठीशी भक्कम उभ्या होत्या. महाराष्ट्राच्या ओसाड, आशाहीन जमिनीवर आशेचे अंकुर फुलविण्याचे काम शिवाजी महाराजांनी केले.

**गनिमी कावा रणनीतीची उद्दिष्ट्ये -**

1. शत्रूला घाबरवून किंवा त्यांच्या मनात दहशत निर्माण करून अशी परिस्थिती तयार करणे की ज्याद्वारे शत्रूला शरण येण्यास बाध्य करता येईल.
2. शत्रूचे मानसिक खच्चीकरण करून त्यांना कोंडीत पकडून लढाईचे मैदान सोडून पळून जाण्यास भाग पाडणे.
3. शत्रूला आर्थिकदृष्ट्या अपंगत्व आणून त्यांचे नुकसान करून त्यांच्यावर स्वतःचा दरारा निर्माण करणे.
4. शत्रूला मुद्दाम चुकीची माहिती पुरवून त्यांना फसवणूक करून त्याची दिशाभूल करणे. आणि शत्रूला लढाई मैदान सोडून पळून जावयास लावणे.
5. शत्रूला बेसावध करून त्यांची सैन्याची फळी विस्कळीत करणे. जसे आपण दुर्बल आहोत किंवा आपल्यात लढाईची हिम्मत नाही असे भासविणे आणि आपण शरण येण्याची बतावणी करून एकदम, अनपेक्षितपणे शत्रूवर आघात करणे.
6. लढाईचे क्षेत्र स्वतःला अनुकूल आणि शत्रू पक्षाला प्रतिकूल असे निवडून शत्रूला कसेही करून तेथे नेणे.
7. शत्रूला आपला पाठलाग करावयास भाग पडेल अशी व्यवस्था निर्माण करणे.

8. शत्रू पक्षातील म्होरक्याला म्हणजेच मुख्य अधिकारी सैन्याला ठार करणे जेणे करून शत्रुसैन्यात गोंधळ निर्माण होऊन शत्रूंचे सैन्य रणांगण सोडून पळून भाग पडेल.

**गनिमी कावा रणनीतीची वैशिष्ट्ये -**

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य उभारणीसाठी स्वीकारलेली रणनीती म्हणजे गनिमी कावा. गनिमी कावा रणनीती म्हणजे लपून छपून शत्रूच्या गोटावर अचानकपणे वेगवान हल्ले करणे होय. शिवाजी महाराजांकडे सैन्याची, मनुष्यबळाची कमी असताना देखील गनिमी कावा पद्धतीमुळे कमी सैन्याच्या छोट्या - छोट्या तुकड्या करून तत्कालीन मुस्लिम शाह्यांना त्यांनी जेरीस आणले. त्यामुळे शिवछत्रपतीच्या गनिमी काव्यांचे वैशिष्ट्ये समजून घेणे गरजेचे आहे. ते पुढील प्रमाणे सांगता येईल.

**वेगवान हल्ले -**

गनिमी कावा युद्ध पद्धतीने शिवाजी महाराजांचे सैन्य शत्रूवर अचानकपणे, सावधानी पूर्वक वेगवान हल्ले करीत. ज्यामुळे बेसावध शत्रूला सावध होण्यास तसेच विचार करण्यासाठी वेळ सुद्धा मिळत नव्हता. स्वराज्यातील मावळे हे दख्खन भागातले असल्याने आणि डोंगराळ भागात त्यांचे सततचे वास्तव्य असल्यामुळे उपजतच त्यांच्यामध्ये चपळता आणि वेगवान हालचाली करण्याची क्षमता होती. दऱ्या, डोंगर, झाडे, झुडपे, पर्वतराजीवर चढ-उतार करण्याने त्यांचे शरीरही त्या प्रकारचे बनलेले होते. त्यामुळे वाऱ्याच्या वेगाने त्यांच्या हालचाली होत त्यामुळे शत्रूंना धावता भुई थोडी होत होती.

**संबंधित प्रदेशाचे अचूक ज्ञान -**

छत्रपती शिवाजी महाराजांची गुप्तहेर खाते इतके स्वामिनिष्ठ, जागरूक, सुसज्ज आणि कर्तव्यदक्ष होते की, "शत्रूच्या गोटातील माहिती ते अचूकपणे काढून शिवाजी महाराजांपर्यंत पोहोचवीत होते. ज्या प्रदेशावर हल्ला करायचा त्या प्रदेशाची खडानखडा, अचूक माहिती देत." त्यामुळे ज्या प्रदेशावर हल्ला करायचा त्या प्रदेशाची अचूक माहिती सैन्यांना मिळाल्यामुळे सैन्याच्या हालचाली अधिकच अचूक आणि वेगवान पद्धतीने होत होत्या.

**चपळ लष्करी हालचाली -**

गनिमी कावा या रणनीतीचे महत्त्वाचे वैशिष्टे म्हणजे लष्कराच्या चपळ हालचाली होय. यासाठी शिवाजी महाराजांनी पुरेपूर काळजी घेतली होती. लष्कराच्या हालचाली चपळ व्हाव्यात म्हणून जास्त डामडौल न करता, बाजारबुणगे लष्करांत न घेता साधी राहणी प्रस्थापित केली. या साध्या राहणीमुळेच सैन्यात चपळता वाढली. भाला, धनुष्यबाण, तलवार, बिचवा ही मराठ्यांनी हत्यारे, अवजड तोफखाना त्यांच्याजवळ कधीच नव्हता. भाकती, घोड्याचे तोबऱ्याचे हरभरे, घोंगडे इतक्या कमी सामानासह ते वेगाने चपळतेने हालचाली करीत व शत्रूवर आपली दहशत बसवीत होते.

**अंगरक्षकाची भूमिका -**

'तारीखे दिल्कुशा' या ग्रंथात भीमसेन सक्सेना यांनी असे म्हटले आहे की, ''शिवाजीराजे सत्पुरूष होतेच. शिपाई गडी म्हणून अद्वितीय होते. राजनीतीमध्ये निपुण होते. त्यांचे सैन्य एकनिष्ठ होते आणि त्यांच्यासाठी प्राणपणाला लावण्यास सदैव तत्पर होते.'' अफझलखानास मारल्यानंतर त्याचा अंगरक्षक शिवाजी महाराजांवर धावून आला. चपळतेने जिवा महालाने त्याचा हात आपल्या तलवारीने उडविला. झटापटीत खानाचे सर्व अंगरक्षक मारले गेले. भोई खानास पालखीत घालणार एवढ्यात संभाजी कावजीने भोयांच्या पायावर वार करून खानाचे शिर धडावेगळे केले. अंगरक्षक व त्यांच्या शस्त्रांची सिद्धता हे राजेच्या प्रशासन व युद्धनीतीचे महत्त्वाचे अंग होते. प्रत्येक प्रसंगात अंगरक्षक सावधानता बाळगत.

**लष्करात कडक शिस्त -**

गनिमी कावा युद्धात सैन्य संख्या कमी म्हणून कठीण परिस्थितीत संघर्ष चालू ठेवण्यासाठी कठोर शिस्तीची गरज शिवाजी महाराजांनी ओळखली होती. शत्रूचे सैन्य स्वराज्यामधील पिके कापून नेत, अन्न-धान्याची लूट करीत, स्त्रियांची विटंबना करीत होते. हे सर्व कृत्ये स्वराज्याच्या सैन्यात होऊ नये, हे सर्व टाळण्यासाठी त्यांनी आपल्या सैन्यात कठोर शिस्तीचे पालन आवश्यक केले होते. म्हणूनच स्वराज्य आणि शिवछत्रपतीसाठी त्यांच्यावरील आदर, प्रेमामुळे अनेकांनी आत्मबलिदान केले. उदा. हिरोजी फजंद, मदारी मेहतर, शिवा न्हावी, बाजी प्रभू इत्यादी.

शिवाजी महाराजांच्या स्वराज्यातील लष्करी शिस्तीबद्दल सभासद म्हणतात की, ''लष्कराने पावसाळी विशी आपल्या देशी यावे, दसरा होताच कूच करून आठ महिने मुलूखगिरीस जावे, परमुलखी पोट भरावे, खंडण्या घ्याव्यात, लष्करात बायको, बटकी, कलावंतीण नसावी जो बाळगेल त्याची गर्दन मारावी, परमुलुखात बायका, पोरेन धरावी, मर्दाना धरावा, गायी न धरावी, ओड्यास बईल धरावा बोलीप्रमाणे खंडणी पैका घ्यावा, बदअंमल न करावा वैशाख मासी परतोनी आपले मुलुखाचे सरदेशमुखास लष्कराचा झाडा द्यावा. राजाचे दर्शनास जावे." अशी लष्करात कडक शिस्त लावलेली होती. शिस्त भंग केल्यास, राजाज्ञा मोडल्यास यावर लष्करी सैन्याना कडक शासन केल्या जाई.

**स्वराज्य रक्षणासाठी गनिमी कावा या रणनीतीचा उपयोग -**

शिवाजी महाराजांनी स्वराज्याचा विस्तार, रक्षण करण्यासाठी गनिमी कावा ही रणनीती अतिशय उत्तम, सुनियोजित पद्धतीने उपयोगात आणली. शत्रूला बेसावध, गाफील ठेवून त्यांच्यावर अचानक हल्ला करणे, अनेक वर्षे दुर्लक्षित असलेल्या शत्रूच्या ठिकाणांवर आक्रमण करणे, आपली सैन्यसंख्या कमी असूनही शत्रूला जास्त वाटावी असा आभास निर्माण करीत वेगवान आक्रमण करणे या सर्वांचे प्रशिक्षण त्यांनी सैन्याला दिले होते. आपल्यासाठी शत्रू प्रतिकूल ठिकाणी असेल तर त्याला आपल्यासाठी अनुकूल रणक्षेत्रावर आणणे हा छत्रपतींच्या रणनीतीचाच भाग होता. रणनीती ही युद्धातील महत्त्वाची बाब होय. स्वराज्यावर आलेल्या बलाढ्य संकटांचा प्रतिकार देखील शिवाजी महाराजांनी याच रणनीतीने केलेला दिसून येते. ज्यामध्ये शाहिस्तेखानावरील छापा, अफझलखान प्रसंग, सुरत लूट, पन्हाळ्याचा वेढा ही महत्त्वाची आहे.

**अफझलखनाचा वध -**

गनिमी कावा यासाठी नेतृत्व, धाडस व कौशल्य ह्या आवश्यक गोष्ट असल्याचे अफझलखान प्रकरणात स्वतः छत्रपती शिवाजी महाराजांनी दाखवून दिले. शिवाजी महाराजांनी आपल्या जहागिरीतील व आसपासच्या आदिलशाही प्रदेशातील किल्ले घेण्यास सुरुवात केली. जावळीच्या मोऱ्यांचा विरोध मोडून काढलेला होता. कोकण किनारपट्टीवर स्वराज्य स्थापनेच्या कार्यास गती मिळाली. या सर्व गोष्टी हे आदिलशाहीस आव्हान होते. त्यामुळे शिवाजी महाराजांचा बंदोबस्त करण्यासाठी आदिलशाहीतील अफजलखान या बलाढ्य व अनुभवी सरदारास चालून जाण्यास सांगितले. अफजलखान विजापूरहून वाई येथे आला. त्याला वाई प्रांताची चांगली माहिती होती. वाईजवळील प्रतापगड किल्ल्याच्या पायथ्याशी शिवाजी महाराज आणि अफजलखान यांची 10 नोव्हेंबर 1959 रोजी भेट झाली. या भेटीत अफजलखानाने दगाफटका करण्याचा प्रयत्न केल्याने शिवाजी महाराजांनी त्याला ठार मारले आणि आदिलशाही सैन्याचे पारिपत्य केले. अफजलखानासारख्या बलाढ्य सरदाराला देखील शिवाजी महाराजांनी आपल्या गनिमी कावाया रणनितीने मात दिली.

**शाहिस्तेखान छापा -**

मराठ्यांच्या इतिहासातील 1661 ते 1663 हा कालखंड प्रचंड संघर्षाचा आणि धकाधकीचा होता कारण मुघल बादशाह औरंगजेब यांचे बडे सरदार आणि मामा शाहिस्तेखान दख्खन मोहिमेवर होते. या दोन वर्षांच्या काळात दख्खनमधील शेतांची राखरांगोळी झाली होती, असं सर जदुनाथ सरकार यांनी त्यांच्या 'Shivaji and His Times' या पुस्तकात लिहिलं आहे.
शाहिस्तेखान लाल महालात मुक्काम ठोकून होता. तेव्हा शाहिस्तेखानाच्या समोर मोजक्या मावळ्यांसह शिरणे, भिंत फोडून प्रवेश करणे हे धाडसी काम होते ते शिवाजी महाराजांनी 5 एप्रिल 1663 मध्ये करून दाखविणे. त्यांनी लाल महालात शाहिस्तेखानावर हल्ला करून त्याची बोटे कापली आणि त्यांना तेथून पळवून लावले त्यामुळे शिवाजी महाराजांचा मुघल दरबारात धाक निर्माण झाला आणि स्वराज्यावरचे संकट टळले.

**सुरत शहरातील लूट -**

सूरत हे मुघलांचे प्रमुख बंदर. याच बंदरातून मुघलांचा व्यापार पर्शियन आखातापर्यंत चालायचा. इथे अनेक गडगंज व्यापारी आणि मक्का-मदिनेसाठी जाणारी जहाजंही असत. त्यामुळे सूरत शहर लुटले तर मुघलांना जरब बसून भरपूर संपत्ती मिळेल असा विचाराने शिवाजी महाराजांनी मुघलांच्या वर्चस्वातील सुरत शहर दोनदा लुटले. त्यापैकी पहिली लूट 5 जानेवारी 1664 रोजी आपल्या घोडदळासह केली होती. दुसरी सूरत लुट सहा वर्षांनी ऑक्टोबर 1670 मध्ये करून तीन दिवस सूरत शहरातील संपत्ती मिळवली. पहिल्यांदा सूरत लुटले तेव्हा त्याचा फटका इंग्रजांच्या वखारीला बसला नव्हता. ब्रिटिशांच्या वखारी त्या मराठ्यांच्या तडाख्यातून सहीसलामत सुटल्या परंतु दुसऱ्या सूरत लुटीनंतर मराठे या बंदरापर्यंत अगदी सहज पोहोचू शकतात, हे इंग्रजांना अगदी स्पष्ट जाणवलं. सुरतेची लूट शक्य झाली ती केवळ शिवाजी महाराजांच्या गनिमी कावा या रणनीती मुळेच कारण या लुटीच्या पहिले सुरत शहराची इत्यंभूत माहिती शिवाजी महाराजांनी त्यांच्या गुप्तहेर यंत्रणेकडून मिळाली होती.

**पन्हाळयाचा वेढा -**

स्वराज्याला विरोध करणाऱ्या आदिलशाहाने शिवाजी महाराजांचा बंदोबस्त करण्यासाठी इ.स. 1660 मध्ये सिद्दी जौहर या कर्नुल प्रांताच्या सरदारास स्वराज्यावर चालून जाण्यास सांगितले. या परिस्थितीत शिवाजी महाराजांनी पन्हाळा किल्ल्यावर आश्रय घेतला. सुमारे पाच महिने सिद्दी जौहरच्या सैनिकांचा पन्हाळयास वेढा पडला होता. वेढ्यातून बाहेर पडणे शिवाजी महाराजांना कठीण झाले होते. नेतोजी पालकरने बाहेरून सिद्दीच्या सैन्यावर हल्ला करून वेढा उठवण्याचा प्रयत्न केला; परंतु त्याचे सैन्य थोडे असल्याने हा प्रयत्न यशस्वी झाला नाही. सिद्दी वेढा उठवेल, अशी चिन्हे दिसत नव्हती. म्हणून शिवाजी महाराजांनी गनिमी काव्याने सिद्दीशी आपण शरणागती पत्करण्यास तयार असल्याची बोलणी सुरू केली. त्यामुळे सिद्दीने पन्हाळगडास दिलेल्या वेढ्यामध्ये शिथिलता निर्माण झाली. या शिथिलतेचा फायदा घेवून शिवाजी महाराजांनी वेषभूषा करून आपल्या जागी शिवा काशिद या बहादूर तरुणाने पुढाकार घेतल्याने त्याला तेथे ठेवून पालखीतून चतुराईने राज दरवाज्यातून बाहेर पडले. पालखी सिद्दीच्या सैन्याने पकडल्याने शिवा काशिदने स्वराज्यासाठी बलिदान केले. शिवाजी महाराज पन्हाळगडाच्या वेढ्यातून बाहेर पडून विशाळगडाकडे निघाले त्यावेळी त्यांना त्यांच्या जाण्याच्या वाटापासून ते कुठे थांबायचे, शत्रूच्या चौक्या ह्या सर्वांची इत्यंभूत माहिती त्यांच्या गुप्तहेरांनी दिली होती. सिद्दी जौहरच्या सैन्याने पाठलाग केला आता त्यांच्या सैन्यास विशाळगडाच्या पायथ्याजवळ थोपवण्याची जबाबदारी बाजीप्रभू देशपांडे यांनी घेतली. बाजीप्रभूने गजापूरजवळील घोडखिंडीत त्या सैन्यास अडवले. बाजीप्रभूने पराक्रमाची शर्थ करून वीरमरण पत्करले आणि त्यानंतर शिवाजी महाराज विशाळगडावर सुखरूप पोचले.

या सर्व प्रसंगावर मात करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजाजवळ सैन्य, शस्त्र आणि आर्थिक पाठबळ जरी कमी होते तरीही त्यांच्या जवळ चपळता, बुद्धीचातुर्य आणि त्यांनी निर्माण केलेली गनिमी कावा ही रणनीती होती ज्याच्या जोरावर त्यांनी स्वराज्यामध्ये आलेल्या प्रत्येक संकटावर यशस्वीपणे मात केली.

**निष्कर्ष -**

1. गनिमी कावा हे नाव जरी छत्रपती शिवाजी महाराजांनी वापरलेल्या पद्धतीमुळे सर्वश्रृत झाले असले तरीही प्राचीन काळापासून गनिमी काव्या युद्धाप्रमाणेच युद्धनीती कार्यरत होती.
2. छत्रपती शिवाजी महाराजांनी यवनी अत्याचाराची प्रतिक्रिया व राजकीय परिवर्तनासाठी दखखनमध्ये गनिमी कावा युद्धनीती विकसित केली.
3. गनिमी कावा युद्धनीतीसाठी त्यांना सह्याद्रीच्या नैसर्गिकतेचा व पर्यावरणाचा पुरेपूर वापर करून घेतला.
4. स्वतः छत्रपती शिवाजी महाराज अनेकदा या युद्धनीतीत सैन्याला सक्षम नेतृत्व दिले.
5. गनिमी कावा ही युद्धविद्या लष्कराने प्रामाणिकपणे व विश्वासूपणे आत्मसाद केल्याने शत्रूचे हल्ले छत्रपती शिवाजी महाराज परतवून शकले. त्यामुळे स्वराज्य विस्तारले व स्थिर स्थावर झाले.
6. चपळता, वेगवान हालचाली, हेरगिरी, शत्रूला खचवणे अशा अनेक वैशिष्ट्यांनी परिपूर्ण अशी ही युद्ध पद्धती होती.
7. ही युद्धनीती शिवकाळात व त्यानंतरच्या काळातही यशस्वी ठरली.
8. मध्ययुगातील ही गनिमी कावा युद्धपद्धती विशेष गौरवास्पद ठरली.

9. गनिमी कावा युद्ध पद्धतीमध्ये स्वराज्यातील गुप्तहेर खाते आणि बहिर्जी नाईक या गुप्तहेर खाते प्रमुखाची भूमिका अत्यंत मोलाची, अभिमानास्पद, गौरवास्पद आणि प्रशंसनीय आहेत. त्यांच्या कार्यकर्तुत्वाला स्वराज्यापासून वेगळे करणे अशक्यप्राय आहे.
10. छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेल्या अल्पावधीत उभारलेले स्वराज्य पाहता गनिमी काव्याचे महत्त्व लक्षात येते.
11. विसाव्या आणि एकविसाव्या शतकात देखील आपल्या राजसत्ता टिकविण्यासाठी, संघर्षासाठी गनिमी कावा युद्ध पद्धती वापरल्या गेल्याची उदाहरणे आपल्याला दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ सूची -**


1. आपटे, द. वि. - शिवाजी निबंधावली, भारतीय इतिहास संशोधन मंडळ पुणे, वार्षिक इतिवृत्ते व अहवाल पुणे 1930.
2. कुलकर्णी अ.रा - शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथामावृत्ती 1993.
3. कुलकर्णी श्री. रं, - शिवकालीन राजनीती आणि रणनीती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, 1984.
4. कुरुंदकर, नरहर, (संपा.) - छत्रपति शिवाजी महाराज जीवन रहस्य, पुणे, 1980.
5. कोलारकर श. गो. - मराठ्यांचा इतिहास, मंगेश प्रकाशन, नागपूर, 2003.
6. गाठाळ, एस.एस. - मराठ्यांचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.
7. जोशी. शं. ना. - अर्वाचीन महाराष्ट्रेतिहास काळातील राज्यकारभाराचा अभ्यास, भाग 1, पुणे, 1959.
8. देशमुख, विजय - महाराजांच्या मुलुखात, वैशाली प्रकाशन, नागपूर, पहिली आवृत्ती, ऑक्टोबर 1976.
9. देशमुख, विजय - शककर्ते शिवराय (उत्तरार्ध), छत्रपती सेवा प्रतिष्ठान नागपूर.
10. पवार जयसिंगराव, मराठी सत्तेचा उदय, पृथ्वी पब्लिकेशन, कोल्हापूर, 2010.
11. बेंद्रे, वा. सी. - श्री छत्रपती महाराजांचे चिकीत्सक चरित्र, मुंबई 1972.